जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड,
सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
ऑफिस मो. : ८२६२०५६४८०
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖
**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५७ वे ❖ अंक ६ वा ❖ फेब्रुवारी २०२६ ❖ वीर संवत २५५२ ❖ विक्रम संवत २०८२

| या अंकात | पान नं. |
|---|---|
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय ३ : चतुरंगीय | १५ |
| ● भारत सरकार जनगणना - धर्म के कॉलम में सिर्फ जैन लिखें | १९ |
| ● महाराष्ट्र राज्य २९ महानगर पालिका चुनाव जैन समाजाचे ४२ उमेदवार विजयी | २० |
| ● सौ. मनीषा प्रवीण चोरबेले - नगरसेवक पदी | २३ |
| ● मध्यस्थ वृत्ती : आध्यात्म समृद्धि | २४ |
| ● ट्रेन का नामकरण - मूकमाटी एक्सप्रेस | २५ |
| ● कव्हर तपशील | २६ |
| ● विभाव से कर्मोंका आवरण, स्वभाव रमण से कर्म मुक्ति का आचरण | ३१ |
| ● सुविचार | ३३ |
| ● किस का दोष (Who's Foult) | ३५ |
| ● दुसरों के सन्मान में झुकिए | ३६ |
| ● संस्कार से जीवन - निर्माण | ३७ |
| ● नफरत V/s प्यार | ३८ |
| ● श्री गांगाणी तीर्थ - भोपलगढ | ४१ |
| ● इच्छापत्र काळाची गरज | ४२ |
| ● धीरे हॉर्न बजा रे पगले, जैन समाज सोया है | ४३ |
| ● बिने जाने कित जाऊँ - प्रश्नोत्तरी प्रवचन | ४४ |
| ● मंत्राधिराज प्रवचनसार | ४६ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा : चोखा चोखा कामकर | ४९ |
| ● पासवर्ड - Passward | ५१ |
| ● बैंक बेलेन्स - Fix Deposit | ५२ |
| ● तीन लोक | ६१ |
| ● समस्या का समाधान | ६९ |
| ● हास्य जागृती | ७१ |
| ● World Canser Day | ७५ |
| ● कॅन्सरची तोंड ओळख | ७६ |
| ● वर्धमान महावीर नॉलेज पार्क, अहिल्यानगर | ७८ |
| ● कोबा ज्ञान मंदिर | ७९ |
| ● ह्या हृदयीचे त्या हृदयी : वसंतऋतु प्रेमाचा | ८० |
| ● नामको हॉस्पिटल, नाशिक | ८७ |

- संचेती ट्रस्ट, पुणे ८७
- स्वानंद – रौप्य महोत्सवी वर्ष ८८
- संघर्ष से उत्कर्ष – पुस्तक का लोकार्पण ८८
- जैन साधू साध्वी विहार – पोलीस संरक्षण ८९
- पत्रकार श्री. देवेंद्रजी जैन, पुणे ८९
- सूर्यदत्त ग्रुप – पुरस्कार ९१
- महावीर जैन विद्यालय, पुणे ९१
- सरहद, पुणे – लडाख महोत्सव ९२
- आचार्य आनंदऋषिजी स्कूल–कासरवाडी ९३
- श्री सच्चियाय माताजी मंदिर – पुणे ९३
- अर्हम् फाऊंडेशन, पुणे ९५
- सुरक्षा : चेतावनी की उपेक्षा अतिशय विलाप का कारण बन सकती है १०२
- विविध धार्मिक, सामाजिक बातम्या



जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र साठी)

✻ वार्षिक वर्गणी – रु. ८०० ✻ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २३००

जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र बाहेर)

✻ वार्षिक वर्गणी – रु. ९०० ✻ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २६००

मॅगझिन पोस्ट या सुविधेमुळे प्रत्येक ग्राहकांना १००% अंक ३ ते ४ दिवसात मिळणार.

या अंकाची किंमत ५० रु. • Google Pay - M. 9822086997


## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा.
- 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.


जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/Google Pay - M. 9822086997/ AT PAR चेक/पुणे चेकने/RTGS इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**
**Bank : STATE BANK OF INDIA • Branch : Market Yard, Pune 37.**
**Current A/c No. : 10521020146 • IFS Code : SBIN0006117**

'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रा वर आधारीत

# ॥ जिनेश्वरी ॥



## अध्याय ३ - चतुरंगीय

प्रवचनकार : उपाध्याय प.पु. श्री. प्रवीणऋषिजी म.सा. *(क्रमशः)*

या आत्म्याला आवश्यक परंतु उत्तरोत्तर दुर्लभ असे चार अंग आहे. मनुष्य जन्म, धर्मश्रवण, धर्म श्रध्दा व संयमात पराक्रम यांची क्रमाक्रमाने प्राप्ती होऊ शकते. विश्व चक्राच्या फेऱ्यातुन मुक्ती मिळवण्याचा हा मार्ग आहे, अध्यायरूपी कमळाचा हा मकरंद आहे. तो सतत आनंदात ठेवण्याचे सामर्थ्य आणि सद्बुध्दी देतो.

आत्म्याला कर्मामुळे शरीर अनंत काळापासून मिळत आहे. कधी मनुष्याचे शरीर मिळते, कधी देवाचे, कधी पशुचे शरीर मिळते परंतु जेव्हा पशूचे शरीर मिळाले त्या बरोबर पशुवृती, पशूचे मन मिळते. नरकात गेलो त्या शरीरा बरोबरच नारकीय मन सुध्दा मिळाले. देवयोनीत गेलो दैवी मनोयोग प्राप्त होतात. परंतु दारूण दुःख आहे, आपल्या जीवनाचे मनुष्याला मनुष्याचे शरीर मिळूनही मानवी मन का मिळत नाही ? आणि जोपर्यंत मन्युष्यत्व मिळत नाही, माणुसकी प्राप्त होत नाही तो पर्यंत प्राप्त झालेले तीर्थ सुध्दा व्यर्थ होते आहे.

अनेक चक्रवर्ती वैभव आणि विलासाच्या शिखरावर पोहोचले... चक्रवर्तीचे अमाप वैभव... ३२ हजार देव सेवेत उपस्थित. सुखाची.. परिसीमा गाठली पण माणुसकीची उंची गाठु शकले नाही म्हणुन वैभवप्राप्ती आणि १४ महामूल्यवान रत्ने मिळूनही मातीतच मिळाले, नरकाचाच रस्ता दाखवला.

**मानवते मागे भगवत्ता धावत येते**

परमात्मा अगदी सखोल गोष्ट सांगत आहे की हे पहा, पशुच्या जन्मातही माणुसकी जागृत होऊ शकते. चंडकौशिका सारख्या विषधराच्या मनात अमृतधारा निर्माण झाली म्हणजे पशुच्या शरीरात प्रभुता प्रकटली. जेथे माणुसकी आली तेथे महानता दिव्यता आलीच समजायचे. जेथे माणुसकीची पहिली पायरीच नाही तेथे धर्माचा प्रवेशच व्यर्थ आहे. जेथे मानवता नाही तेथे भगवत्ता नाही. भगवत्तेची पहीली पायरी मानवता आणि शेवटची पायरी प्रभुता आहे. म्हणुन देवाचरणी प्रार्थना आहे की भगवंता आमच्यांत माणुसकी निर्माण होऊ दे.

माणुसकीची व्याख्या काय आहे? कान-प्राण आणि लक्ष देऊन ऐका दुसऱ्याचे दुःख अनुभव करण्याची दिव्य क्षमता, दुसऱ्याचे ऐकण्याचे सामर्थ्य, समोरच्यांची वेदना, संवेदना जाणवण्याची जिवंतता, दुसऱ्याच्या दुःखाने आपल्या डोळ्यात पाणी येण्याची जिवंतता, परक्यांचे दुःख-शोक बघून शोकाकुल होणारे हळवे हृदय ज्याचे असते त्याला माणुसकी, मानवता म्हणतात.

आणि अगदी स्पष्ट सत्य आहे की ज्याला दुसऱ्याच्या दुःखाला साद देता येते त्यालाच परमेश्वराचे पसायदान प्रतिसाद देऊ शकते. ज्याला दुरितांचे दुःख ऐकूच येत नाही जो त्यांना होकार देऊ शकत नाही तो ओंकार करूच शकत नाही. ज्या भाग्यवंताने दुःखी लोकांचे दुःख ऐकले, जाणले, अनुभवले जसे शिबी राजाने अनुभवले, जसे मेरू प्रभुतीने अनुभवले होते तेथे त्याच क्षणी मानवतेचा जन्म होतो आणि भगवत्तेचा विकास होतो. मानवतेच्या पाठोपाठीच भगवत्ता लपून येत असते. जे

फक्त भगवत्ते मागे धावतात ते माणुसकी शुन्य असतात. आणि जे मानवत्तेचे पुजारी असतात देव त्यांचा पाठलाग करत त्यांना गाठतोच. जशी वासराला भेटण्यासाठी गाय हंबरते धावते तशी मानवते मागे भगवत्तां धावते-पावते.

**धर्मश्रवण**

पुढील प्रक्रिया-क्रम भगवंत सांगत आहे की जेंव्हा माणुसकी निर्माण होते त्यानंतर धर्मश्रवणाची प्रबळ प्रांजळ इच्छा होऊ शकते आणि हे नितांत सत्य आहे की अंतरंगात जर माणूसकी नसेल तर... दुसऱ्यांचे दुःख जाणण्याची जाणीवच नसेल तर कितीही ज्ञान प्राप्त करा, प्रवचन ऐका भक्ती गीत भजन किर्तने ऐका, भगवंताच्या नामाचा जप करा पण ते सारं निसार आहे. जसा प्रेताला केलेला शृंगार आहे. आणि जेंव्हा अंतरात माणुसकी जन्माला येते तेंव्हा थोडंहि ऐकलं तरी श्रध्देचे अंकुर फुटायला लागतात. माणुसकी नाही तर हृदय वांझोटा सारखं नापिक होतं. श्रध्दा जगण्याची कुवतच राहत नाही.

**श्रध्दा**

श्रध्दा त्याला म्हणतात, भगवत् भाव त्याला म्हणतात जेंव्हा शुभ क्रिया करतांना अत्यंत उत्कट आंनदाची अनुभूती होते. जशी शबरी रामाची वाट पाहत होती, जेंव्हा रामाचे पदार्पण झाले. शबरीचं तन-मन सर्वस्व समर्पण झाले होते. ती केवळ बोरं देत नव्हती स्वतःची भक्ती त्या बोरां बरोबर जोडून देत होती म्हणून भगवत्त्ते बरोबर जोडली गेली तिला त्यात परमानंद आत्मानंद मिळाला.

आपण आत्ता श्रीमद् उत्तराध्यायन सूत्राचे पारायण करीत आहोत ही सुवर्णसंधी, हा मणिकांचन योग प्राप्त झाला ते पारायण करता करता मनात अत्यानंदाची लहर उमटली कि मी ''किती सौभाग्यवंत -भाग्यवंत की प्रपंच-पसारा सोडून परमेश्वराची, भगवंताची दिव्य वाणी, अमृतवाणी ऐकण्यासाठी इथपर्यंत पोहोचलो. माझे कान, माझे मन, माझा जन्म धन्य झाला, सार्थक सफल झाला'' ही अनुभूती पारायणाच्या वेळी अंतरंगात आली तर नारायण जागला समजा, श्रध्देचा जन्म होणारच, परंतु केवळ ऐकले पण जाणले नाही तर तेवढा वेळ प्राप्तीत गेला. स्वाध्याय झाला पण भक्ती आराधना झाली नाही. कारण श्रध्दा नाही.

**श्रध्देचे सामर्थ्य**

जेंव्हा श्रीमद् उत्तराध्ययन सूत्राचे पारायण असते, नवीन तरुण असतात जे प्रथमतः पुस्तकावर नजर फिरवतात.. तेही शब्दांनी उच्चारण करतात. ज्यांना हे शुध्द बोलता येत नाही ते भक्ती रसात जेंव्हा भिजून जातात तेव्हा हे दिव्य शब्द सहजतया रसनेत उतरून येतात. शर्त केवळ एकच आत्मभाव हवा, श्रध्दा हवी. कीर्तनकारां कडून ऐकले होते की ''तुम्हाला वाचता येत नसेल, अक्षर ओळख देखील नाही तरी केवल ज्ञानेश्वरी वरुन नजर फिरवत जा.. ज्ञानेश्वरी आपोआप डोळ्यात, डोक्यात... जिभेत उतरेल.'' कोणाही कडून शिकली नसेल पण भक्ती भावाचा अविर्भाव असावा, श्रध्देत अकल्पनीय - अनिर्वचनीय सामर्थ्य असते. श्रध्देत अशी किमया आहे की जो कधी विचार सुध्दा केला नव्हता, ज्याचं कधी स्वप्न सुध्दा पाहिले नाही ते जीवनात सत्य व्हायला लागते आणि ते एकदा सत्य झालं की सावधपणा यायलाच हवा म्हणून भगवंत जागृत करत आहे.

**संयमात पराक्रम करा**

श्रध्देचे वैभव प्राप्त झाल्यावर एक क्षण देखील असंयम करु नका. मर्यादेचे उल्लंघन करण्याचा विचार देखील मनाला शिवु देता काम नये. आता पुढे-पुढेच चालायचे. माणुसकी आली धर्म ऐकण्याची कला अवगतच झाली, श्रध्देचे अवतरण झाले, आता संयमाने पराक्रम करा. असंय मात-अंधाऱ्यात-पापात कधी ही आपली शक्ती पणाला

लावू नका. नाही तर श्रध्देचा हिरा कोळश्यात रुपांतरित होतो. काठावर आलेला पुन्हा गटांगळ्या खात बसतो. लखलखीत प्रकाशाचे रुपांतर पुन्हा काळंकुट्ट अंधाऱ्यात होतो.

महावीर गाथेची घटना डोळ्यासमोर आणा, परमात्मा ऋषभदेवां समवेत भगवान महावीरांना चैतन्य स्वरूप 'मरीची' च्या जन्मात किती अपूर्व-अभुतपूर्व श्रध्दा प्राप्त झाली होती, ती अद्वितीय श्रध्दा-अद्‌भुत मंत्र असून देखील एका क्षणासाठी मन दुर्बळ झाले आणि 'शिष्य पाहिजे ही तुच्छ भावना निर्माण झाली आणि मरीचीच्या जन्मात भगवंताची चेतना असंयमाने गढूळ झाली. भगवत् प्राप्ती, शुध्दात्म्याची प्राप्ती या व्यतिरिक्त शिष्य प्राप्तीची इच्छा झाली आणि शिखरावरून दरीत कोसळायला निमित्त बनली. ती इच्छापूर्ती झाली. एक नाही अनेक शिष्य मिळाले पण भगवत् चेतना हरवली.. त्या वैभवाला ते पारखे झाले, ती मौलिक संपदा मूल्यहीन इच्छेमुळे लोपली गेली. हे ऐकुन जागृतीचा शंखनाद करा की जेंव्हा तुम्ही सत्संगात याल भगवंत चरणी येण्याचे भाग्य लाभेल तेंव्हा किरकोळ वस्तू मागुन दरिद्री बनू नका. प्रभूपाशी जाऊन फक्त प्रभूला मागा, प्रपंच मागत बसु नका कारण प्रभु मिळाले की सर्व काही मिळाले यालाच 'संयमात पराक्रम' म्हणतात.

**मनुष्य जन्माची सार्थकता**

अंतरंगातील सर्व अतृप्ती, वासना, कामना सर्व विसर्जन करा या महासागरात भगवंत, माझ्या मनातील सर्व भावना तुझ्याठायी अर्पण आहे. आता रागावणं, भांडण, प्रेम करणं सर्व तुझ्याशीच आता कुठेही हात पसरणार नाही. कुणालाही शरण जाणार नाही. कोणापुढे पदर पसरणार नाही. तुच माझ्या हृदयात सदैव वास करणार तर असंयम, अमर्यादेला आता जागाच उरणार नाही. तुझी सदैव उपस्थिती मला कुठल्याही परिस्थितीत, प्रतिकूलतेत संयमातच ठेवील.

अशा उत्कृष्ट श्रध्देचे, भक्तीभावाचे उदाहरण आहे राम भक्त हनुमान. आपण अनेक वेळा वाचले आणि ऐकले आहे. एक-एक मोती तोडुन त्यात राम आहे की नाही हे पाहणारा हनुमान... असे भाव -अशी श्रध्दा की पाहणे बोलणे वागणे सर्व काही राममय झाले होते. आपल्यालाही स्वतःकडे दृष्टीपात करायला हवा की माझे हृदय ईश्वरमय-परमात्मामय झाले आहे का? आणि ही चेतना-परम चैतन्यमय करण्यातच या मनुष्य जन्माचे सार्थक आहे आणि हेच न साधल्यामुळे भगवंत सांगतात नेमकी इथेच चूक केल्यामुळे किती वेळा जीवात्मा देव-नरक-पशू योनीत फिरत राहला मनुष्य योनीत ही कधी चांडाळ कधी ब्राह्मण झाला पण मनुष्यत्व प्राप्त झाले नाही. म्हणुन पुन्हा पुन्हा या विश्वचक्रात फिरतच राहीला. मनुष्य जन्म मिळुनही माणुसकी प्राप्त झाली नाही. मग पुन्हा यात्रा सुरू किडे-मकोडे-पशु-हत्ती-कुत्रा आदी योनीत भटकतच राहतो. देवयोनीत जाऊन पुन्हा किड्याचा जन्म घेतला आपल्या सर्वांचे परमभाग्य की कर्म शुध्दि आणि मनाच्या विशुध्दीमुळे आपल्याला मानवाचा जन्म प्राप्त झाला. परंतू मानवाची आकृती मिळुन देखिल मानवाची प्रकृती प्राप्त केली नाही.

**चतुरंगीय जीवाला सिद्धत्वप्राप्ती**

या मातीच्या देहात मानवतेची ज्योत पेटवली तरच हा देह ज्योर्तिमय होईल. या मातीच्या शरीरात भगवत्तेची ज्योत पेटत नाही तो देह विदेह होण्या अगोदर केवळ दाह होऊन जातो. मातीत मिळण्या आधी ज्योतीत मिळणे या मातीचे सार्थक करणे आहे. मातीत ज्योती जळते केवळ मानवतेनेच. मानवते मधूनच धर्माचा जन्म होतो. ज्याला धर्म ऐकता आला तोच श्रध्देने चिंब झाला आणि ज्या भुमीत श्रध्देचे पाणी झिरपते तेथेच सम्यक पुरषार्थाचे बीज विकसित होते.

पण फारच दुर्भागी असतो तो व्यक्ती जो माणुसकीची प्राप्ती करतो, धर्म ऐकतो धर्मावर श्रध्दा ठेवतो परंतु धर्मामध्ये पुरुषार्थ करण्याची वेळ आली की पळुन जातो... मागे सरकतो.

जसे घरुन मंदिरात जाण्यासाठी कोणी निघाला... मंदिरात पोहचला भगवंताची आरती केली. प्रसाद घेण्याची वेळ आली तर निघून गेला. याला असंयमात पराक्रम म्हणतात. सर्व काही तयार करणे आणि प्रयोग करण्याच्या वेळी पलायन करणे-मागे सरकणे.

जो संयमात पराक्रम करतो त्याची आत्मज्योत परमात्मज्योती समान पवित्र बनते. अग्नीत तूप टाकल्यावर जसा तो निर्मल होतो, निर्धूर होतो तशाप्रकारे आलोचना केल्यामुळे आत्मा-विशुध्दी होते व अशा जिवाला क्षमा आदी दहा धर्म असे मिळतात जशी नदी सागराला जाऊन मिळते आणि मग सर्व जगत ज्यासाठी तळमळते आहे असे हे १० धर्म. प्राप्त झालेल्या जीवाकडे सर्व पुण्य पराक्रम सहज येतात.

आत्म्यासाठी आवश्यक मनुष्य जन्म, धर्मश्रवण, श्रध्दा, संयमात पराक्रम असे हे ४ दुर्लभ अंग प्राप्त झालेला जीव जेव्हा आत्मा-विशुध्दी करुन चालतो तेंव्हा त्याला सिध्दत्वाची प्राप्ती होतेच होते.

हे पथिका !

भगवंतानी सांगितले कि जीवनातील चार वरदान कधी विसरु नका.

१) माणूसकी
२) धर्मश्रवण
३) श्रद्धा
४) संयमात पुरुषार्थ करणे

हे चारही वरदान विस्मृत होऊ देऊ नकोस. कशीही परिस्थिती असो जशी असेल तशी आनंदाने स्विकार कर... •


जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वांत खात्रीशीर, सर्वांत सोपा व सर्वांत स्वस्त मार्ग



**जैन जागृति**

जैन जागृतित जाहिरात देऊन
जैन समाजाशी संवाद साधा.

**जैन जागृति - एप्रिल २०२६**
**"भगवान महावीर जन्मकल्याणक अंक"**

एप्रिल २०२६ अंकासाठी २० मार्च २०२६ पर्यंत जाहिरात पाठवा.

| आर्ट पेपर वर रंगीत (Colour) जाहिरात | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. ९०००/-* |
| १/२ पान | रु. ४७००/-* |
| GST - 5% Extra. | |

| व्हाईट पेपरवर एका रंगात(Black & White) जाहिरात | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. ४२००/- |
| १/२ पान | रु. २५००/- |
| १/४ पान | रु. १४००/- |

आजच्या स्पर्धेच्या युगात जाहिरात ही अत्यावश्यक बाब झाली आहे. जैन समाजात 'जैन जागृति' हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात 'जैन जागृति' मध्ये द्या. - संपादक

जैन जागृति - "धर्म प्रभावना" व "समाज सेवा" चे ५७ वे वर्ष...

## भारत सरकार जनगणना

# धर्म के कॉलम में सिर्फ ''जैन'' लिखे

## जैन भाई-बहनों जागो, जागृत हो जाओ, जैन समाज जागृती अभियान ।

भारत सरकार हर १० वर्ष के बाद राष्ट्रीय जनगणना करती है । सन २०११ में जनगणना हुई थी । २०२१ में कोरोना की वजह से जनगणना हुई नहीं । जनगणना अब जल्द ही शुरु होनेवाली है । इस बार जनगणना पेपरलेस होने के कारण टॅबलेट पर जानकारी लिखनी है ।

२०११ के जनगणना में जैन धर्मियों की जनगणना सिर्फ ४५ लाख दिखाई गई है । परंतु वास्तव में जैन धर्मियों की लोकसंख्या इससे कई गुना अधिक ही है । गुरुदेव भगवंत और जानकारों के मतानुसार जैन धर्मियों की संख्या २ से ३ कोटी होगी।

जैन धर्मियों की लोकसंख्या जनगणना में कम आकडे आने के कारण निम्नलिखित हो सकते हैं ।

१) जनगणना प्रतिनिधी जब अपने घर आता है उस समय अधिकांश लोग धर्म के कॉलम के आगे श्वेतांबर जैन, दिगंबर जैन, स्थानकवासी जैन, हिंदु जैन, जैन हिंदू, ओसवाल जैन, पोरवाल जैन इ. लिखते हैं । वास्तव में ऐसा कुछ भी न लिखे बल्कि धर्म कॉलम के आगे मात्र 'जैन' ही लिखें । जैन धर्म एक स्वतंत्र और अति प्राचीन धर्म है । जैन धर्म किसी भी धर्म की शाखा, उपशाखा नहीं है ।

२) जनगणना प्रतिनिधी जब फॉर्म भरता है तब अपने मन से ही बिना पूछे ही धर्म के कॉलम में कोई भी धर्म लिख देता है । कईयों को ऐसा अनुभव आया है ।

३) जनगणना अधिकारी जब फॉर्म भरने अपने घर पर आता है उस समय महिला अथवा बालक घर पर होते हैं । उन्हें धर्म के कॉलम में क्या लिखना है वह मालूम नहीं होता । अत: धर्म के कॉलम में कुछ भी लिख दिया जाता है ।

फॉर्म अच्छी तरह ध्यान देकर पढ़ने के बाद धर्म के कॉलम में सिर्फ 'जैन' लिखना है इसका जरुर ध्यान रखें ।

---

**''पाकृत'' भाषा :** जनगणना फॉर्म में मातृभाषा के कॉलम के साथ और कौनसी भाषा जानते हो ऐसा कॉलम होता है उसमें आप 'प्राकृत' भी लिखे । हमारे अधिकतर ग्रंथ प्राकृत भाषा में है । हम रोज प्रार्थना करते हैं उसमें से बहुत से श्लोक प्राकृत भाषा में हैं । अत: भाषा के कॉलम में प्राकृत का उल्लेख जरुर कीजिए । सरकारी कार्यालय में 'प्राकृत' भाषा का आस्तित्व टिकाए रखना है।

---

केंद्र सरकार और राज्य सरकार राष्ट्रीय जनगणना के आधारपर विविध योजना बनाते हैं । वैसे ही विविध राजकीय पक्ष भी इस जनगणना के आधार पर अपना नेता चुनते हैं और अनेक योजना को कार्यान्वित करते है । लोकशाही का तत्त्वज्ञान है - ''जितनी जिनकी संस्था भारी, उतनी उनकी भागिदारी'' अत: जैनों की सही जनसंख्या राष्ट्रीय जनगणना में आना अत्यंत आवश्यक और महत्त्वपूर्ण है ।

जैन समाज के नेतागण, विविध संस्था, आचार्य भगवंत, साधु-साध्वीजी भी इस ओर विशेष ध्यान देकर लोगों में जागृती निर्माण करें । विशेष आग्रहपूर्वक लोगों में प्रचार करें कि धर्म के कॉलम में 'जैन' ही लिखें ।

हमारा अस्तित्व हमें कायम स्वरुपी टिकाए रखना है । जैनों की संख्या कोट्यावधी होते हुए भी मात्र कुछ लाखों की गिनती जनगणना में दिखाई जा रही है । जनगणना फॉर्म में जैनों की संख्या केवल 'जैन' न लिखने के कारण कम होती जा रही है । कहीं ऐसा न हो कि जैन धर्म भारत सरकार राष्ट्रीय जनगणना में नामशेष हो जाए । अत: जागरुक रहिए । भारत सरकार जनगणना धर्म के कॉलम में सिर्फ 'जैन' लिखे । यह हमारा अभियान संपूर्ण भारत के जैन समाज में करने का संकल्प करना है और अधिक से अधिक प्रचार प्रसार करना है । यह हर जैनी का परम कर्तव्य है । -

# महाराष्ट्र राज्य 29 महानगर पालिका चुनाव - 2026
# जैन समाज के 42 उम्मीदवार विजयी हुए ।

## पुणे महानगर पालिका – विजयी उम्मीदवार



श्री. बाळासाहेब ओसवाल
प्रभाग क्रमांक–३९ (भाजपा)



सौ. मनीषा प्रविणजी चोरबेले
प्रभाग क्रमांक–२१ (भाजपा)



सौ. सपना आनंदजी छाजेड़
प्रभाग क्रमांक – ८ (भाजपा)

## बृहन्मुंबई – BMC महानगर पालिका

१) सौ. जिग्ना शाह,
प्रभाग क्रमांक – १५ (भाजपा)

२) श्री. हिमांशु पारख,
प्रभाग क्रमांक – २२ (भाजपा)

३) श्री. धवल व्होरा,
प्रभाग क्रमांक – ३० (भाजपा)

४) सौ. सुनिता राजेश मेहता,
प्रभाग क्रमांक – ७१ (भाजपा)

५) श्री. हेतल गाला, प्रभाग क्रमांक – ९७ (भाजपा)

६) श्री. हेतल गाला (मोटवेकर),
प्रभाग क्रमांक – १०३ (भाजपा)

७) सौ. कल्पेशा जैसल कोठारी,
प्रभाग क्रमांक –१७७ (भाजपा)

८) श्री. गौरांग चेतन जवेरी,
प्रभाग क्रमांक – २१७ (भाजपा)

## मीरा भाईंदर

१) श्री. राकेश शाह, प्रभाग क्रमांक – ५ (भाजपा)

२) सौ. सुनीता जैन, प्रभाग क्रमांक – ६ (भाजपा)

३) श्री. परेश शाह,
प्रभाग क्रमांक – ६ (भाजपा)

४) श्री. भारत कोठारी,
प्रभाग क्रमांक – ६ (भाजपा)

५) डॉ. भव्या पिपलिया(शाह),
प्रभाग क्रमांक – ७ (भाजपा)

६) सौ. डिंपल मेहता (पुर्व महापौर),
प्रभाग क्रमांक–१२ (भाजपा)

७) सौ. प्रीति जैन, प्रभाग क्रमांक–१३ (भाजपा)

८) श्री. दिनेश जैन, प्रभाग क्रमांक–२० (भाजपा)

९) सौ. सीमा शाह, प्रभाग क्रमांक–२१ (भाजपा)

## भिवंडी

१) सौ. रिषीका प्रदिप(पप्पू) राका,
प्रभाग क्रमांक–६ (भिविआ)

## कोल्हापूर

१) श्री. विशाल शिरोळे,
प्रभाग क्रमांक–७ (भाजपा)

२) सौ. प्रतिज्ञा महेश उत्तरे,
प्रभाग क्रमांक–१५ (शिवसेना उबाठा)

३) श्री. राजेश भरत लाटकर
प्रभाग क्रमांक–४ ड (काँग्रेस)

## इचलकरंजी

१) सौ. नूतन दिलीप मुथा,
प्रभाग क्रमांक – १० (शिवसेना शिंदे)

२) सौ. संगीता आलासे जैन
प्रभाग क्रमांक–८ (शिव–शाहू विकास आघाडी)

## सांगली/मिरज/कुपवाड

१) सौ. पद्मश्री पाटील, सांगली,
प्रभाग क्रमांक–१ (भाजपा)

२) सौ. मालुश्री महावीर खोत, कुपवाड,
प्रभाग क्रमांक–२ (भाजपा)

३) श्री. संदिप आवटी, मिरज,
प्रभाग क्रमांक – ३ (भाजपा)

४) सौ. अर्पणा विवेक शेटे, मिरज,
प्रभाग क्रमांक–४ (भाजपा)

५) श्री. निरंजन आवटी, मिरज,
प्रभाग क्रमांक–४ (भाजपा)

६) सौ. साक्षी बोरगाव, सांगली,
प्रभाग क्रमांक – १७ (राष्ट्रवादी आ. प.)

## जलगांव

१) श्री. अमर (भागचंद) जैन,
प्रभाग क्रमांक–८ (भाजपा)

## अहिल्यानगर

१) सौ. अनीता विपुल शेटिया,
प्रभाग क्रमांक–१३ (राष्ट्रवादी–आ. प.)

२) सौ. मिना संजय चोपडा,
प्रभाग क्रमांक–१४ (राष्ट्रवादी–आ. प.)

## नाशिक

१) सौ. श्वेता निर्मल भंडारी,
प्रभाग क्रमांक–२१ (भाजपा)

## संभाजी नगर

१) सौ. ज्योती मुकेश गंगवाल,
प्रभाग क्रमांक–७ (भाजपा)

## जालना

१) श्री. विरेंद्र अमरचंद धोका,
प्रभाग क्रमांक–६ (भाजपा)

## नांदेड

१) श्री. सुमित प्रकाश मुथा,
प्रभाग क्रमांक – १७ (भाजपा)

## परभणी

१) श्री. रितेश कांतीलालजी झांबड,
प्रभाग क्रमांक–५ (भाजपा)

## नागपुर

१) सौ. वैशाली विकास उदापुरकर,
प्रभाग क्रमांक–१८ (भाजपा)

## अमरावती

१) ॲड. सौ. प्रिती हर्षल रेवणे
प्रभाग क्रमांक–१२ (स्वाभीमानी युवा पार्टी) •

प्रेषक : श्री. महेंद्रजी मंडलेचा, चंद्रपुर.
मो. ९८२२३६६६०१

**जैन समाजात सर्वांत जास्त खपाचे**
**व लोकप्रिय मासिक – जैन जागृति**

## कव्हर तपशील - फेब्रुवारी २०२६




❖ **गांगाणी तीर्थ – राजस्थान**

श्री गांगाणी तीर्थ, ता. भोपाल गढ, जि. जोधपूर, राजस्थान या तीर्थांचा लेख पान नं. ४१.

❖ **पुणे मनपा नगरसेवक पदी जैन समाजाचे विजयी उमेदवार**

- ✻ पुणे महानगर पालिकेत जैन समाजाचे तीन उमेदवार नगरसेवक पदी निवडून आले आहे.
- ✻ श्री. बाळासाहेब ओसवाल (प्रभाग क्र. ३९ – भाजपा)
- ✻ सौ. मनीषाताा प्रवीण चोरबेले (प्रभाग क्र. २१ – भाजपा)
- ✻ सौ. सपना आनंद छाजेड (प्रभाग क्र. ८ – भाजपा)

महाराष्ट्रातील २९ महानगर पालिका मध्ये जैन समाजाचे सुमारे ४२ उमेदवार विजयी झाले आहेत. (बातमी पान नं. २०)

❖ **महावीर जैन विद्यालय, पुणे**

महावीर जैन विद्यालय पुणे येथे BMS Auditorium प्रेक्षागृहाचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. (बातमी पान नं. ९१)

❖ **साकला चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे**

सौ. प्रमिलाबाई नौपतलालजी साकला चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या वतीने कात्रज, पुणे येथील श्री सच्चियाय माताजी नवदुर्गा मंदिरच्या २९ व्या वर्धापन दिना निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन केले गेले. (बातमी पान नं. ९३)

❖ **सूर्यदत्त ग्रुप – तितीक्षा दिप स्तंभ पुरस्कार**

पुणे येथील सूर्यदत्त ग्रुप इन्सिट्यूशनला तितिक्षा आंतरराष्ट्रीय दिप स्तंभ पुरस्कार देण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजयजी बी. चोरडिया यांनी हा पुरस्कार स्विकारला. (बातमी पान नं. ९१)

❖ **सरहद, पुणे – लडाख महोत्सव**

सरहदच्या वतीने लडाख फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले. त्या अंतर्गत कारगील गौरव नॅशनल अवॉर्ड २०२५ हे विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना पंजाबचे नायब राज्यपाल श्री. कविंदरजी गुप्ता यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. (बातमी पान नं. ९२)

❖ **अर्हम् फाऊंडेशन, पुणे**

पुणे येथील अर्हम् फाऊंडेशनचा गॅदरींग व बक्षीस समारंभ भव्य कार्यक्रमात संपन्न झाला. (बातमी पान नं. ९५)

❖ **डायग्नोपिन डायग्नोस्टीक, पुणे**

पुणे येथील डायग्नोपिन डायग्नोस्टीकला व्हाईस ऑफ हेल्थ केअरच्या वतीने ''मोस्ट इमर्जिंग चेन ऑफ डायग्नोस्टीक'' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार संचालक श्री. मितेशजी प्रफुल्लजी कोठारी यांना मुंबई येथे देण्यात आला. (बातमी पान नं. ९९) •

जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत
पोहचण्याचा सर्वांत खात्रीशीर,
सर्वांत सोपा व सर्वांत रिजनेबल मार्ग...
जैन जागृति